# आकाशवाणी पुणे
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 05.10.2023** **वार – गुरुवार**

---

**<u>निवडणूक</u>**

राज्य निवडणूक आयोगाने पुणे जिल्ह्यातील एकंदर 231 ग्रामपंचायतींच्या निवडणुका जाहीर केल्या आहेत; 157 ग्रामपंचायतींमधील पोटनिवडणुका देखील याचवेळी घेतल्या जाणार आहेत. यात बारामती तालुक्यातील सर्वाधिक म्हणजे 32 ग्रामपंचायतीसाठी निवडणूक आहेत. त्यापाठोपाठ आंबेगाव 30, जुन्नर 26, खेड 25, मुळशी तालुक्यातील 23 आणि मावळ तालुक्यातील 20 ग्रामपंचायतींमध्ये निवडणूक होणार आहे. 16 ऑक्टोबरपासून उमेदवारी अर्ज सादर करता येणार असून 5 नोव्हेंबर रोजी मतदान आणि 6 रोजी मतमोजणी होणार आहे. 20 ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल केले जाणार असून 25 तारखेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील.

**<u>कृषी विद्यापीठ</u>**

दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमधील भेसळ रोखण्यासाठी दूध उत्पादक शेतकऱ्यांनी स्थानिक पातळीवर उच्च दर्जाचे दुग्धजन्य पदार्थ तयार करून ग्राहकांचा विश्वास संपादन करण्याची गरज निर्माण झाली आहे, असं मत महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांतकुमार पाटील यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. कृषी महाविद्यालयामधील पशुसंवर्धन आणि दुग्धशास्त्र विभागातील देशी गाय संशोधन आणि प्रशिक्षण केंद्रात देशी गाईंच्या दुधापासून सॉफ्टी आइस्क्रीम बनवण्याचं यंत्र कार्यान्वित करण्यात आलं आहे; या यंत्राचं उद्घाटन करताना ते बोलत होते.

**<u>बाल हक्क आयोग</u>**

राज्यात सरकारी रुग्णालयात होत असलेल्या नवजात बालकांच्या मृत्यूंची महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगानं गंभीर दखल घेतली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य बालहक्क आयोगाचे सदस्य चैतन्य पुरंदरे यांनी पिंपरीच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाला अचानक भेट देऊन तिथल्या बालरोग विभागाची पाहणी केली आणि या विभागातील आवश्यक वैद्यकीय यंत्रणा सुविधा आणि औषधं  लसीचा पुरवठा याचा त्यांनी आढावा घेतला.

**<u>सुळे</u>**

आवश्यक मनुष्यबळच उपलब्ध नसल्याने आरोग्य यंत्रणेची कार्यक्षमता कमी झाली आहे; त्यामुळे आरोग्य सेवेवर परिणाम होत आहे असा आरोप खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे. तसंच आरोग्य खात्यात तातडीने सर्व रिक्त पदांची भरती करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी राज्य शासनाकडे केली आहे. याबाबत त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहिलं आहे.

**<u>भूल परिषद</u>**

पुण्यात आजपासून महाराष्ट्र राज्य भूलतज्ञ परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. यात सुमारे 12शे प्रतिनिधी सहभागी झाले आहेत अशी माहिती परिषदेचे आयोजक डॉ.एच.के.साळे यांनी दिली. या परिषदेदरम्यान शहरातील विविध रुग्णालयांमध्ये विशेषतः तरुण आणि नवोदित भूलतज्ञांसाठी मार्गदर्शनपर कार्यशाळा होतील, असं त्यांनी सांगितलं.

**<u>आयुर्वेद</u>**

श्री सदगुरु विश्वनाथ महाराज रूकडीकर ट्रस्ट कोल्हापूर आणि श्री विश्ववती आयुर्वेदीय चिकित्सालय यांच्या वतीनं पुण्यात उद्या आयुर्वेदा संदर्भातील राष्ट्रीय परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. यावेळी आयुर्वेद प्रदर्शन तसंच आरोग्य तपासणी आणि उपचार शिबिरही घेण्यात येईल. त्याचबरोबर आयुष मंत्रालय आणि भारतीय उपचार पद्धती आयोगाच्या सहकार्याने सुरु करण्यात येणाऱ्या आयुष्मान भारत डिजिटल मिशनचं उद्घाटनही उद्या होणार आहे. आयोगाचे अध्यक्ष डॉ. राकेश शर्मा आणि ट्रस्टचे विश्वस्त वैद्य समीर जमदग्नी यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

**<u>ध्वनी प्रदूषण</u>**

नुकत्याच पार पडलेल्या गणेशोत्सवामध्ये मोठ्या प्रमाणावर ध्वनी प्रदूषण झालं; त्या पार्श्वभूमीवर साऊंड अँड इल्क्ट्रीकल्स जनरेटर्स असोसिएशन, पुणे या संघटनेनं आज पुण्यात पत्रकार परिषद घेत आपली भूमिका मांडली. गणेश मंडळांची वाढती संख्या, त्यांच्यामध्ये ध्वनिवर्धकांच्या आवाजावरून होणारी स्पर्धा, बाजारात उपलब्ध होणारी साऊंड आणि लेझरची घातक चिनी उत्पादनं आणि गणेशोत्सव काळात पुण्याच्या बाहेरून येणारे व्यावसायिक यामुळे पुण्यातील गणेशोत्सव सामान्यांसाठी जीवघेणा ठरतो आहे. तसंच या सगळ्यात प्रामाणिकपणे काम करणारे साऊंड आणि इलेक्ट्रीक क्षेत्रातील व्यावसायिक बदनाम होत आहेत. या पार्श्वभूमीवर पोलीस आणि प्रशासनाने घातक ध्वनी प्रदूषण आणि जीवघेण्या लेझरवर नियंत्रण आणावे, अशी मागणी संघटनेचे अध्यक्ष बबलू रमजानी यांनी यावेळी केली.

**<u>क्रीडा</u>**

नांदेडमध्ये सुरू असलेल्या तिसऱ्या राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत पुण्याच्या नील मुळ्ये आणि नैशा रेवसकर यांनी सतरा वर्षाखालील मुले आणि तेरा वर्षाखालील मुलींच्या गटात अजिंक्यपद पटकावले.

**<u>हवमान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 3 तर किमान तापमान 19 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सियस नोंदवण्यात आलं. उद्याही साधारण असंच तापमान राहील आणि आकाश मुख्यतः निरभ्र असेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**